दि. ३०/१०/२२.

① महाराष्ट्र टाईम्स पान नं.०१

# पोलिस भरतीला तात्पुरती स्थगिती

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

करोनामुळे दोन-तीन वर्षांपासून रखडलेली पोलिस भरती प्रक्रिया १ नोव्हेंबरपासून सुरू होणार होती. मात्र, या प्रक्रियेला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. १ नोव्हेंबरला यासंदर्भात प्रसिद्ध करण्यात येणारी जाहिरात पुढील आदेशापर्यंत प्रसिद्ध करू नये, असे पोलिस महासंचालक कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे. याचे नेमके कारण गुलदस्त्यात असले, तरी उमेदवारांच्या ऑनलाइन अर्ज प्रक्रियेत तांत्रिक अडचणी येत असल्याने तात्पुरती स्थगिती देण्यात आल्याचे पोलिस सूत्रांकडून समजते.

**१ नोव्हेंबरची जाहिरात पुढे ढकलली**



करोनाच्या संसर्गामुळे महाराष्ट्र पोलिस दलामध्ये शिपाई पदाची भरती दोन ते तीन वर्षांपासून रखडली होती. शिंदे-फडणवीस सरकारने पोलिस खात्यातील (पान ९वर)

पान नं.०८.

# पोलिस भरतीत 'तांत्रिक' अडथळा

(पान एकवरून) ही मेगाभरती करत असल्याची घोषणा केली होती. त्यादृष्टीने पोलिसांनी तयारीदेखील सुरू केली. या घोषणेनंतर राज्याच्या कानाकोपऱ्यात इच्छुकांनी पूर्वतयारी केली होती. पोलिस महासंचालक कार्यालयाने भरतीची जाहिरात १ नोव्हेंबर रोजी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल, असे जाहीर केले होते. या जहिरातीमध्ये उमेदवारांना अर्ज करण्यापासून पुढील भरतीच्या प्रक्रियेची माहिती देण्यात येणार होती. या जाहिरातीनंतर लगेचच ऑनलाइन अर्ज भरण्यास सुरुवात केली जाईल, असे म्हटले होते.

तीन वर्षांपासून रखडलेली भरती होत असल्याने राज्यातील इच्छुक तरुणांमध्ये आनंदाचे वातावरण होते आणि हे उमेदवार जाहिरातीची आतुरतेने वाट पाहत होते. असे असतानाच शनिवारी पोलिस महासंचालक कार्यालयाकडून एक पत्र जारी करण्यात आले. सर्व पोलिस आयुक्त आणि राज्यातील अधीक्षकांना हे पत्र पाठविण्यात आले असून यामध्ये जाहिरात देण्याबाबतची कार्यवाही पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात येत असल्याचे नमूद केले आहे.

## अडचण दूर झाल्यावर स्थगिती उठवणार

प्रशासकीय कारणामुळे ही स्थगिती देण्यात आली असून जाहिरात देण्याची तारीख यथावकाश कळविण्यात येईल, असे पोलिस महासंचालक कार्यालयाकडून जारी पत्रात म्हटले आहे. प्रशासकीय कारण म्हटले असले, तरी काही तांत्रिक अडचणी येत असल्याने भरती प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. तांत्रिक अडचण ही १ नोव्हेंबरपूर्वी दूर झाल्यास ही स्थगिती उठवली जाईल आणि ठरल्यानुसार जाहिरात प्रसिद्ध केली जाईल, असे पोलिस सूत्रांनी सांगितले.

दि. ३०/१०/२२.

(प्र) सकाळ पृ. पान नं. ०७

# भाईंदरमध्ये कांदळवन उद्यान

## शहर विकास आराखड्यात पर्यावरणाला प्राधान्य

**वसई, ता. २९ (बातमीदार) : मिरा-भाईंदर शहराच्या विकास आराखड्यात पर्यावरणाच्या दृष्टीने कांदळवनाला प्राधान्य देण्यात आले आहे. त्यानुसार शहरात कांदळवन उद्यान उभे राहणार आहे.**



मिरा-भाईंदर शहरात नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. त्यानुसार विकास साधता यावा, नागरिकांना नव्या योजना मिळाव्यात म्हणून विकास आराखडा गेल्या पाच वर्षांपूर्वी तयार करण्यात आला होता. पण या आराखड्याला हरकत घेण्यात आली व राज्य सरकारने याची गंभीर दखल घेत तो रद्द केला होता. त्यामुळे नवीन आरक्षणे जाहीर करता आली नाही. त्यानंतर ठाणे नगररचना विभागाला नव्याने विकास आराखडा तयार करण्याचे काम सोपविण्यात आले व पाच वर्षांनंतर विकासाची दिशा ठरवून आराखडा तयार करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदरमध्ये कांदळवनाचे प्रमाण मोठे आहे. मात्र अनेकदा अतिक्रमण होत असते, त्यामुळे पर्यावरणाचा प्रश्न नेहमीच चर्चिला जातो. यामुळे कांदळवन सुरक्षित असावे म्हणून नव्या प्रारूप आराखड्यात कांदळवन उद्यान विकसित करण्यासाठी आरक्षण जाहीर केले आहे; तर नेहमीच रोजगाराच्या निमित्ताने महिला शहरात ये-जा करत असतात. मात्र त्यांना राहण्याची व्यवस्था नसते, अशा महिलांसाठी वसतिगृहदेखील उभारण्यात येणार आहे. मिरा-भाईंदर शहरातील विशेष मुलांना शिक्षण घेता यावे म्हणून शाळेसाठी आरक्षण आहे, तर व्यक्तिमत्त्व विकास केंद्र, बालसंगोपन केंद्र, तारांगण, वस्तुसंग्रहालय, मेट्रो कारशेड करता देखील आरक्षण असणार आहे.

### हरकतींना एका महिन्याची मुदत

हरकती व सूचना नोंदवण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात आली असून यावेळी आराखड्यात जाहीर केलेले आरक्षण, तसेच अन्य सूचना व हरकती नागरिकांना मांडता येणार आहेत. त्यानुसार विकास आराखड्याला अंतिम मंजुरी देण्यात येणार आहे.

### एकूण ३०७ आरक्षणे

महापालिकेच्या हद्दीत एकूण ३०७ आरक्षणे पाडण्यात आली आहेत. यात शिक्षण, पर्यावरण, महिलांसाठी योजना व यासह मेट्रो कारशेडसाठी देखील आरक्षण आहे.

दि. ३०/१०/२२.

(३) पुढारी पान नं. ०४

# वसई-विरार पालिका कर्मचाऱ्याचा मृत्यू

## पाणी समजून प्यायला डेंग्यू प्रतिबंधक औषध

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

पाणी समजून डेंग्यूवरील उपचाराचे औषध प्यायालयाने एकाचा मृत्यू झाला. रविंद्र किणी (५१) असे मृताचे नाव असून तो वसई-विरार महापालिकेच्या स्वच्छता विभागात कार्यरत होता.

रवींद्र किणी हा सफाळे येथील विराथन या गावात राहतो. तो वसई-विरार महापालिकेच्या आरोग्य विभागात फवारणीचे काम करीत होता. नेहमीप्रमाणे विरारच्या मनवेलपाडा येथील गोडाऊनमध्ये रात्रपाळीला असताना मध्यरात्रीच्या सुमारास किणी याला तहान लागल्यावर त्याने टेबलावरच्या बाटलीतील डेंग्यू तापावरील तयार केलेले औषध पाणी समजून प्याला. सदर औषध अधिक प्रमाणातं पिल्याने त्याला त्रास झाला. त्याच्यासोबतच्या कामावर असलेल्या कर्मचाऱ्यांनी ताबडतोब त्याला रुग्णालयात नेले. पालिकेच्या तुळींज येथील रुग्णालयात उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी या घटनेची तपासणी करणार असल्याचे सांगितले.

(४) पुढारी पान नं. ०५.

# वाहन चोरी व घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक; ७ गुन्हे उघडकीस

**मिरारोड :** नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीत वाहन चोरी, जबरी चोरी, घरफोडी करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला अटक करून त्याने ७ गुन्हे केल्याचे मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने उघडकीस आणले आहे. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात घरफोडी, जबरी चोरी, वाहन चोरीच्या गुन्हयात दिवसेंदिवस वाढ होत असल्याने या गुन्हयांना आळा घालण्यासाठी व दाखल गुन्हे उघडकीस आणण्यासाठी वरिष्ठांनी सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अधिकारी व अंमलदार यांचे एक विशेष पथक नेमण्यात आले होते. या पथकाला एक सराईत गुन्हेगार वाकणपाडा, नालासोपारा येथे घरफोडी, जबरी चोरी गुन्हयात चोरी केलेला मुददेमाल विक्री करण्यासाठी घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली होती. मिळालेल्या माहितीनुसार त्या परिसरात पथकाने सतत दोन दिवस सापळा रचुन २८ ऑक्टोबर रोजी मोटारसायकल वरून येणारा इसम गुरूददीन उर्फ छोटु कनरुददीन शेख, वय २२ वर्ष यास ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे सोन्याचे दागिने, मोबाईल फोन व एक मोटार सायकल असा एकुण १,२५,९९० रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला. त्याची अधिक चौकशी केली असता त्याने विविध पोलीस ठाणे हद्दीत चोरी केल्याचे सांगितले. हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुध्द घरफोडी व जबरी चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे आढळून आले. या आरोपीकडुन घरफोडी चोरीचे २, जबरी चोरीचे ४ व वाहन चोरीचा १ गुन्हा असे ७ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

દિ.૩૦।૧૦।૨૨.

(૫) પુઢારી પાન નં.૦૮

## पोलिसाचा महिलेवर अत्याचार

**नालासोपारा :** वसईतील एका महिलेवर पोलिसानेच अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधित पोलीस फरार झाला आहे. २०२० मध्ये राहुल लोंढे हे वसई पोलीस ठाणे येथे ड्यूटीवर असताना सदर पीडित महिलेची ओळख वाढवली. त्यानंतर एक दिवस घरी बोलावून पीडित महिलेवर अत्याचार केल्याचे पीडितेने तक्रारीत म्हटले आहे. महिलेने दिलेल्या तक्रारीत २२ सप्टेंबर २०२२ रोजी माझे पती घरात नाहीत याची माहिती घेवून राहूल लोंढे व त्याच्या मैत्रिणीने फोन करुन तुझे पती घरी आले नसतील तर तू नालासोपारा येथे ये असे सांगून आपल्याला बोलावून घेतले आणि रात्री ९.३० च्या सुमारास आपल्या घरात आणून जेवणाची पार्टी केली. यावेळी जबरदस्तीने मला दारू पाजली आणि मैत्रिणीच्या मदतीने माझ्यावर अत्याचार केले असे नमूद केले आहे. पोलिसांनी पीडित महिलेच्या तक्रारीनंतर पोलीस राहूल लोंढे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून गुन्ह्याचा तपास सुरू केला आहे. दरम्यान लोंढे हे फरार झाल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

(૬) લોકમત પાન નં.૦૨

## खून करून पळालेला आरोपी गजाआड



लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** औरंगाबाद येथील क्रांतीचौक पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका सुरक्षारक्षकाचा खून करून चार लाख रुपयांच्या विड्या घेऊन पळून गेलेल्या आरोपीला पेल्हार पोलिसांनी अटक केली. चौकशी व तपास करण्यासाठी त्या आरोपीचा ताबा औरंगाबाद पोलिसांना दिला आहे.

क्रांतीचौक पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका चौकीदाराचा खून करून चार लाख रुपयांच्या विड्या घेऊन पळून गेल्याचा गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी औरंगाबाद पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली होती. मात्र, मुख्य आरोपी मुबारक शाह नालासोपारा येथील पेल्हार भागातील जबरपाडा येथे लपून बसला होता. शुक्रवारी औरंगाबाद पोलिसांनी पेल्हार पोलीस ठाण्यात माहिती दिली. पेल्हार पोलिसांनी आरोपी मुबारक शहाला औरंगाबाद पोलिसांच्या ताब्यात दिले. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास चौगुले, गुन्हे पोलीस निरीक्षक महेंद्र शेलार, अमर मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुनील पाटील, तानाजी चव्हाण, सचिन बळीद, मोहसीन दिवाण, किरण आव्हाड, रोशन पूरकर आदींनी केली.

(૭) લોકમત પાન નં.૦૮.

## नालासोपारा येथे आगीत ५ दुकाने जळून खाक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** पूर्वेकडील नालासोपारा रेल्वे स्टेशनजवळील जाधव मार्केटला शनिवारी सायंकाळी सात वाजता भीषण आग लागली.

हे पूर्वेकडील तिकीट काउंटरला लागूनच आहे. शनिवारी संध्याकाळी सात वाजण्याच्या सुमारास आग लागली. आगीत मार्केटमधील ५ दुकाने जळून खाक झाली आहेत. आग इतकी भीषण होती की सुमारे अर्धा किलोमीटर अंतरावरून आगीचा धूर दिसत होता.

या मार्केटमध्ये कपडे, मोबाइल व इतर विक्रेते विविध प्रकारच्या वस्तूंची विक्री करणाऱ्यांची अनेक दुकाने आहेत. शनिवारी संध्याकाळी अचानकपणे या मार्केटला आग लागल्याने खळबळ उडाली. या घटनेची नागरिकांनी तातडीने अग्निशमन दलाला दिली. अग्निशमन दलाचे जवान दोन गाड्यांसह घटनास्थळी दाखल होऊन त्यांनी आगीवर नियंत्रण मिळविले. पोलीसही घटनास्थळी पोहोचून गर्दीला बाजूला करत होते. मागील वर्षी याच मार्केटला भीषण आग लागली होती.

दि. ३०।१०।२१

(१) लोकमत पु.पा.नं.०७

पूजेच्या नावावर अश्लील नाच, गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** शीतलनगर परिसरात एका आयोजकाने कालीदेवीची पूजा व भंडाराचा कार्यक्रम सार्वजनिक रस्त्यात ठेवला होता. प्रत्यक्षात गाण्यांवर तरुणींचा अश्लील नाच-गाण्याचा कार्यक्रम चालविल्याने मीरा रोड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

शीतलनगरमधील डीसीबी बँकेजवळ २८ ऑक्टोबरला सार्वजनिक रहदारीच्या रस्त्यावर स्टेज बांधून रात्री उशिरापर्यंत नाच-गाण्याचा कार्यक्रम चालत असल्याबाबत जागरूक नागरिकांनी तक्रारी केल्या. त्यानंतर मीरा रोड पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक हनीफ शेख व हवालदार बालाजी हरणे हे घटनास्थळी पोहोचले असता तेथे कालीदेवीच्या पूजा व भंडाऱ्याचा कार्यक्रम असा फलक लावून स्टेजवर चित्रपटातील गाण्यांवर दोन तरुणी अश्लील हावभाव करून नाचत असल्याचे दिसून आले. तेथे बघ्यांची मोठी गर्दी जमली होती. पोलिसांनी कार्यक्रमाचा आयोजक संजीवकुमार सदानंद सिंह (४६) याला कार्यक्रम बंद करायला लावून पोलिसांनी ताब्यात घेतले.

(२) पुण्यनगरी पु.पा.नं.०७

पोलिसाकडूनच महिलेवर अत्याचार केल्याची तक्रार दाखल



**नालासोपारा :** वसईतील एका महिलेवर पोलिसानेच अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली असून याप्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस राहुल लोंढे हा फरार झाला आहे.

या महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार ही महिला आणि राहुल लोंढे यांची तिच्या पतीच्या माध्यमातून ओळख झाली. लोंढे यांनी त्यांच्या मैत्रिणीच्या सहकार्याने आपल्याला फसवून अत्याचार केले, असे या महिलेने आपल्या तक्रारीत म्हटले आहे. पीडित महिलेने तक्रार केल्यानंतर नालासोपारा पोलिसांनी गुन्हा दाखल करून फरार राहुल यांचा शोध सुरू केला आहे. लोंढे यांना लवकरच अटक करण्यात येईल, असा विश्वास वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सुपे यांनी सांगितले.

(३) पुण्यनगरी पुरवणी पा.नं.०७.

रात्री उशिरापर्यंत फटाके वाजवणाऱ्यांर गुन्हे दाखल

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये दिवाळी सणामध्ये वाजवण्यात येणारे फटाके व त्याची विक्री करण्यासाठी वेळमर्यादा ठरवून देण्यात आली होती. तरी देखील अनेकांनी पोलीस आयुक्तांच्या आदेशाचे उल्लंघन करून रात्री उशिरापर्यंत फटाके वाजवले व रात्री उशिरापर्यंत फटाक्यांची विक्री केल्यामुळे पोलिसांनी त्यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत.

मीरा-भाईंदर वसई विरार पोलीसआयुक्तालय हद्दीत दिवाळी सणानिमित्त फटाके वाजवण्यासाठी रात्री १० वाजेपर्यंत परवानगी देण्यात आली होती. तरीही नागरिक हे अनेक ठिकाणी वेळेमर्यादेचे उल्लंघन करत रात्री उशिरापर्यंत कर्णकर्कश आवाज व ध्वनी प्रदूषण करणारे फटाके वाजवत होते. तसेच काही काही स्टॉलधारक रात्री उशिरापर्यंत दुकान उघडे ठेवून फटाके विकत असल्याचे दिसून आले. अशा दुकानदारांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. सर्व पोलीस ठाण्याच्या प्रभारी पोलीस निरीक्षकांनी आपापल्या हद्दीमध्ये फटाके विक्री करणाऱ्या स्टॉल धारकांकडून न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांची फटाके विक्रेते पूर्तता करत आहेत किंवा नाही याची व्यक्तिशः दखल घेऊन कार्यवाही करावी व फटाके निश्चित दिलेल्या वेळेतच वाजवले जातील याची खबरदारी घ्यावी, असे पोलीस उपायुक्त विजयकांत सागर यांनी सांगितले होते. १० वाजेपर्यंत फटाके वाजवण्यास परवानगी दिली असताना मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय हद्दीत रात्री उशिरापर्यंत मोठ्या प्रमाणत वायू व ध्वनी प्रदूषण करणारे फटाके वाजवण्यात आले. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत फटाके वाजवणाऱ्यावर व फटाके विक्री करणाऱ्या विविध पोलीस ठाणे हद्दीत १५ स्टॉलवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच रात्री उशिरापर्यंत फटाके वाजवणाऱ्या दोघांवर पोलिसांनी कारवाई केली आहे.